शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

विविध कार्यालयात काम करणा-या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पाठविलेले क्र.-युएनआाय/उशिसं/संकीर्ण/२०१८/विशि-१/४२०५, दि.०४ एप्रिल, २०१८ चे पत्र सदर पत्रासोबतचे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र.संकीर्ण/२०१८/प्र.क्र.३३/२०१८/आस्था, दि.२६ मार्च, २०१८ चे पत्र तसेच उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र.संकीर्ण ०११८/प्र.क्र.१६/विशा ६, दि.२२/०२/२०१८ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविले आहे. त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,

सोबत - वरीलप्रमाणे.

उपकुलसचिव

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 63
दि. 27 APR 2018

Estt

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय,(उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमार,पुणे ४११००१

Web: www.dhepune.gov.in Mail Id: vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स०२०/२६१११९५३

क्र.-युएनआय उशिसं /संकीर्ण /२०१८ / विशि- १ / 4205 दिनांक- ४/४/२०१८

04 APR 2018

प्रति,

कुलसचिव,

सर्व अकृषि विद्यापीठे,

**विषय** -विविध शासकीय कार्यालयात काम करणा-या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजना करणेबाबत.

**संदर्भ** - शासनाचे पत्र क्र.संकीर्ण -२०१८/प्र.क्र.३३/१८/आस्था /दि.२६/३/२०१८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्रासाबेत गृह विभागाचे पत्र दि -२२/२/२०१८ चे पत्र सोबत जोडलेले आहे. सदर शासन पत्रात कळविले आहे की, पोलिस आयुक्त बृहन्मुंबई यांनी कळविलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यातबाबत शासनाने कळविले आहे

तरी दिनांक. २२/२/२०१८ च्या पत्रानव्ये आपण आपल्या स्तरावर आवश्यकती कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा.

( सुयश दुसाने )

प्रशासन अधिकारी

शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण )

महाराष्ट्र राज्य पुणे- १

**प्रत**- मा.शा.भा.पारनाईक, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुबंई -३२ यांना माहितीस्तव सादर.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
आवक विभाग
डी. डी./अप्ल. पी. ओ
APR 2018
विभाग 103
सही
क्रमांक

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2
Inward No. 5095
Date 12/04/18

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३३/२०१८/संस्था
उच्च व तंत्र तंत्रशिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
(विस्तार), मजला,
मंत्रालय मुंबई-३२
दिनांक : २६ मार्च, २०१८

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१
26 MAR 2018
6909
आवक क्रमांक:- प्रति. प्रशा-2
शाखा:-

सहसचिव (विद्यापीठ शिक्षण / ग्रंथालये), उपसचिव (महाविद्यालयीन शिक्षण / संस्था / तंत्र शिक्षण / कला), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपायांची अंमलबजावणीबाबत....

उपरोक्त विषयासंदर्भात पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी कळविलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत गृह विभागाचे दि.२२/२/२०१८ चे पत्र सहपत्रांसह सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

सहपत्र : वरीलप्रमाणे

(सा.भा.पारनाईक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

श्रीम शिंदे
प्रत :
अपर सचिव, गृह विभाग यांना त्यांचे पत्र क्र.संकीर्ण ०११८/प्र.क्र.१६/विशा ६, दि.२२/२/२०१८ च्या अनुषंगाने माहितीसाठी अग्रेषित.
श्रीम. कोद्रे यांना दिले.
प्रशा-2
28/3

२१०८८२५;
१७९/ आ१८-७१२
८/३/१८
१०७०
२८/०२/१८

महाराष्ट्र शासन



क्र संकीर्ण ०११८/प्र क्र १६ /विशा ६
गृह विभाग, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२/०२/२०१८.
दु क्र ०२२-२२०२९४०७.
Email ID- home_special6@maharashtra.gov.in,

प्रति,

अपर मुख्य सचिव,उद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव,परिवहन विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव,कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई
पोलीस आयुक्त,मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, ना.ह. सं. व म. अ. प्र. वि.,
पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई.

28 FEB 2018

विषय : शासनाचे विविध विभाग/कार्यालये, खाजगी आस्थापना/कार्यालये यामध्ये काम करणाऱ्या महिला तसेच सार्वजनिक सेवेचा वापर करणाऱ्या महिला व बालकांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना करण्याबाबत.

संदर्भ : या विभागाची समक्रमांक दिनांक १६/०२/२०१८ व दिनांक २१/०२/२०१८ ची पत्रे.

महोदय,

वरील विषयावरील पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांनी कळविलेल्या सुचनाच्या अनुषंगाने मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/२/२०१८ रोजी बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आपल्या विभागाशी संबधित महिला व बालकांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना करणेबाबतच्या सूचना पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

आपल्या विभागाशी संबधित सुचना व्यतिरीक्त इतर सुचनांचा समावेश करावयाचा असल्यास त्याबाबत आपले स्तरावरून निर्णय घेऊन आपले अधिनस्त सर्व कार्यालये यांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात येऊन त्याची प्रत या विभागास पाठवावी हि विनंती.

आपला,

(व्यंकटेश भट)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

F:\data backup\nawale\letter\वस्तुस्थिती.docx3

शालेय शिक्षण विभाग, उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभाग सचिव महाराष्ट्र राज्य, मुंबई व आयुक्त मुंबई महापालिका, मुंबई यांना शैक्षणिक परिसरात महिलांच्या छेडछाडीस प्रतिबंध करण्याबाबत सूचना

१) मुंबईतील सर्व विद्यापीठे, महाविद्यालय, शाळा व इतर शैक्षणिक संस्था यामध्ये महिला छेडछाडीस प्रतिबंध होण्यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. ,

२) सर्व शैक्षणिक संस्थांच्या इमारतीचे, प्रवेशद्वार , बाहेरील/आतील परिसर व मैदानी परिसरात पुरेशा संख्येने सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याचे संस्थेच्या प्रमुखांना कळविण्यात यावे.

३) शालेय विद्यार्थ्यांच्या संरक्षण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने शैक्षणिक संस्थेच्या इमारतीच्या भोवती सुरक्षित भिंतीचे कुंपन असावे. तसेच सुरक्षितेतेच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात.

४) सर्व शैक्षणिक संस्थेच्या प्रवेशद्वारावर व इमारतीत दर्शनी ठिकाणी स्थानिक पोलीस ठाणेचे दूरध्वनी क्रमांक, पोलीस नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्रमांक, महिला/बालक हेल्पलाईन क्रमांक, बालकांसाठी काम करणाऱ्या NGO चे संपर्क क्रमांक ठळकपणे दिसतील असे फलक लावण्यात यावेत.

५) सर्व विद्यार्थ्यांना विशेषत: मुलींना स्वसंरक्षण कौशल्य आणि तंत्रज्ञानावरील प्रशिक्षण देण्याबाबत विचार करावा.

६) संस्थेच्या सर्व कर्मचारी वर्गाला वेळोवेळी महिला अत्याचारा संबंधित तसेच बालकांवरील अत्याचारा संबंधित कायद्यांची माहिती देऊन , त्यांच्या मध्ये संवेदनशीलता/जागरूकता निर्माण करावी.

७) शैक्षणिक संस्थाचालक व विश्वस्त हे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात जागरूक असावेत.

८) शालेय कर्मचारी वर्गाने पोलीस व NGO मदतीने विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक अत्याचाराच्या घटनांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच अशा घटना घडल्यास त्याची माहिती तात्काळ संबंधितांना कळविण्याबाबत माहिती देण्यात यावी.

९) शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांच्या cyber stalking कडे लक्ष पुरवावे. तसेच त्यांना सायबर गुन्हया संदर्भात असलेल्या तरतूदीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृत करण्यात यावे.

१०) संस्थाचालक, विश्वस्त व शालेय कर्मचारी यांना बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१३ (पोक्सो) कायद्यातील तरतुदींची माहिती असावी.

११) सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्था यामध्ये "अंतर्गत तक्रार समिती" (Prevention of sexual harassment of women at workplace Act २०१३) स्थापन झाली आहे याची शहानिशा करून घ्यावी. जर समिती स्थापन झाली नसेल तर अशा समित्या तातडीने स्थापन करण्यास सर्वांना बाध्य करावे.